प्रति,                                                                 दिनांक :-११/०१/२०१६

मा. उप वनसंरक्षक,

अलिबाग

विषय :- **वन जमिन - रायगड**

मौज चांभार्ली, ता. खालापूर येथील संरक्षीत वन सर्व्हे नं. २०/० (नवीन गट नं.१०१) मधून पोहोच रस्त्याकरीता वनजमीन मसगणीचा प्रस्ताव.

संदर्भ :- आपणाकडील पत्र क्र. ब/२०/जमिन/३९९८/२०१५-१६ दिनांक १५/१२/२०१५.

महोदय,

मौज चांभार्ली, ता. खालापूर येथील संरक्षीत वन सर्व्हे नं. २०/० (नवीन गट नं.१०१) मधून पोहोच रस्त्याकरीता वनजमीन मागणीचा प्रस्तावात संदर्भित पत्राच्या अनुशंगाने काढण्यात आलेल्या त्रुटींची खालील प्रमाणे पूर्तता करण्यात आली आहे.

| अ.नं. | काढण्यात आलेल्या त्रुटी | त्रुटींची केलेली पुर्तता |
|---|---|---|
| १. | प्रस्तावात १ ते ५७ बाबींची चेकलीस्ट् | प्रस्तावात १ ते ५७ बाबींची चेकलीस्ट् जोडली आहे. |
| २. | प्रस्तावात अर्जदार व त्यांचे अखत्यारी यांचा संपूर्ण पत्ता त्यांचे पत्रात नमूद करावा जेणे करून प्रस्तावाचे बाबतीतील पत्र व्यवहार करणे सोईचे होईल. | प्रस्तावात अर्जदार व त्यांचे अखत्यारी यांचा संपूर्ण पत्ता खालीलप्रमाणे आहे.<br>१. अर्जदार :- मु.चांभार्ली, ता. खालापूर, जि. रायगड<br>२. अखत्यारी :- २०२- तारंगण चित्रा सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्र समोर अलिबाग.<br>वरीलप्रमाणे माहीती प्रस्तावात नमूद करण्यात आली आहे. |
| ३. | फॉर्म नंबर अ- भाग १ मध्ये ज्या ठिकाणी पान नं. टाकणेचे आहेत. तेथे पान नं. नमूद करण्याची कार्यवाही करावी. | आवश्यक त्या ठिकाणी पान नं. नमूद करण्यात आले आहेत. |
| ४. | फॉर्म नंबर अ- भाग १ मुद्दा क्रमांक ५ मध्ये बंधपत्राचा पान क्रमांक देणेत यावा. | फॉर्म नंबर अ- भाग १ मुद्दा क्रमांक ५ मध्ये बंधपत्राचा पान क्रमांक देणेत आलेला आहे. |
| ५. | प्रस्तावात अर्जदार यांनी श्री. मंदार गडकरी (अखत्यारी) यांना प्रस्ताव सादर करणे प्राधीकृत केलेबाबत अखत्यार पत्र देण्यात यावे. | प्रस्तावात अर्जदार यांनी श्री. मंदार गडकरी (अखत्यारी) यांना प्रस्ताव सादर करणेस प्राधीकृत केलेबाबत अखत्यार पत्र जोडण्यात आले आहे. |

जावक लिपीक
उप वनसंरक्षक
अलिबाग यांचे कार्यालय
3/1/2016

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रस्तावात उक्त् पोहोच रस्त्याचे बांधकामाकरीता अन्य् पर्यायी मार्गाची तपासणी करण्यात आली अगर कसे याबाबत नकाशा व त्याबाबतचा तपशील प्रस्तावात सामील करावा. (३ alignment) | सदर प्रस्तावात मागणी केलेल्या पोचरस्ता येथे मंजूर करण्यात आलेल्या डी.पी. मध्ये रस्ता दर्शविणेत आलेला आहे. तसेच सदर रस्त्याशिवाय असणारे इतर खाजगी क्षेत्रामध्ये इमारतीचे बांधकाम आहे. त्यामुळे अन्य क्षेत्रातून सदर रस्ता तयार करता येणार नाही. याशिवाय सदर प्रस्तावात प्रस्तावित केलेल्या रस्त्यासाठी केवल ०.०१८५ हे.आर. एवढ्या संरक्षित वनाची म्हण्जेच अगदी अत्य्ल्प् वनक्षेत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे एवढ्या अत्य्ल्प् क्षेत्रासाठी पर्यायी मार्ग दर्शविणेही शक्य् नाही. |
| ७. | प्रस्तावांत अन्य् वनेत्तर क्षेत्रांतून रस्ता जात असल्याचे दिसून येत आहे तरी वनक्षेत्र व वनेत्र क्षेत्र अशा सर्व क्षेत्राचा तपशील क्षेत्र विवरण तक्त्यात देण्यात यावा. | सदर प्रस्तावात वनेत्तर क्षेत्रातून रस्ता जात नाही. त्यामुळे क्षेत्र विवरण मध्ये विवरण तक्त्यात विवरण क्षेत्र दर्शविण्यात आलेले नाही. |
| ८. | प्रस्तावात जोडण्यात ग्रामपंचायत ठराव व ७/१२ स्वाक्षांकीत प्रत जोडण्यात यावी. | ग्रामपंचायत ठराव व ७/१२ यांची स्वाक्षांकीत प्रत जोडण्यात आली आहे. |
| ९. | ग्रामपंचायत ठरावाची आंग्ल् भाषेतील ठरावाची प्रत जोडण्यात यावी. | ग्रामपंचायत ठरावाची आंग्ल् भाषेतील ठरावाची प्रत जोडली आहे. |
| १०. | प्रस्तावात जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क् अधिनियम, २००६ अंतर्गत विहीत प्रपत्रातील प्रमाणपत्र सामील असणे आवश्यक आहे. | जिल्हाधिकारी, रायगड यांचे वनहक्क् अधिनियम, २००६ अंतर्गत विहीत प्रपत्रातील प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत जोडले आहे. |

आपला विश्वासू

अश्विन पटेल तर्फे
मंदार गडकरी